# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२३/०८/२०१६

## १) घरातील सामानाची व नगदी पैश्याची चोरी . :—

दिनांक १९/०८/२०१६ रोजी १२.०० वा. ते २२/०८/२०१६ रोजी ०७.३० वा. दर. यातील फिर्यादी हे कुटुंबासह रक्षाबंधना करीता बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन बैठक रुम मधुन व बेड रुम मधील एलसीडी टिव्ही अॅट्रोन कंपनी, सोनी कंपनीचा होमथेटर बॉक्स, १० नग साडया, सोन्याची नथ ०४ ग्रॅम, सोन्याचा लॉकेट ०१ ग्रॅम, चांदीच्या अंगठया १५ नग, चिल्लर १,०००/—रु.-व नगदी ३,०००/—रु. असा एकुण २४,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी लोकेश एकनाथ गायधने वय २७ वर्ष, रा. गडपेंढरी ह. मु. रा. दवडीपार बेला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८०,भांदवि अन्वये गुन्हा नोद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा करीत आहेत.

## २) अल्पवयीन मुले घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २१/०८/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा व त्याचा मित्र हे दोघेही चंद्रपुर येथे जातो असे सांगुन घरुन निघुन गेले असता त्या दोन्ही मुलांना कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

## ३) संगनमत करुन भांडण व मारपीट केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २२/०८/२०१६ रोजी ००.३० वा. दर. यातील फिर्यादी प्रतिक संजय मुलवतकर वय २३ वर्ष, रा. वैशाली नगर न्यु फ्रेन्डस कॉलनी खात रोड भंडारा यांच्या कडे यातील आरोपी हे फिर्यादीच्या भावाचे मित्र असल्याने आले होते. आरोपीनी फिर्यादी यांना बि. ई ची अडॅमिशन होणा—या मुलीना तु काही सांगतोस व नातेवाईकांना काहीपण बोलतोस यावरुन भांडण करुन आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला लाथाबुक्यांनी व काठीने चेह—यावर, पाठीवर व पायावर मारपीट केल्याने डॉ. मेमो वरुन व फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

## ४) मोटार सायकलची चोरी . :—

दिनांक २१/०८/२०१६ रोजी १५.१० वा. ते १९.३० वा. दर. यातील फिर्यादी वसंत रमेश चांदेवार वय ३२ वर्ष, रा. संत कबीर वार्ड चांदणी चौक भंडारा यांनी आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ०२९१ किंमती २०,०००/—रु. ची हिरो होन्डा प्लस ही आय. सी. आय बॅकेचे एटीएम बस स्थानक भंडारा येथे ठेवुन बस स्थानकात गेला असता कोणीतरी अज्ञात चोरांनी सुना मौका पाहुण मोटार सायकल सनी कॉम्पलेक्स बस स्थानक येथुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साकोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.